# खबर
से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

● WEBSITE : https://khabarsehakikattak.in

● Email : shirishkumarsherkhane@gmail.com

संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ | कार्यकारी संपादक : ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष २ रे. | अंक ०१ ला. | सोमवार दि.१० ते १६ जून २०२४ | RNI No. : MAHMAR/2023/86200 | किंमत २ रूपये | पाने : ४


नम्रता, प्रामाणिकपणा, पारदर्शकता हिच देशाची अखंडता

## नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा शपथविधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

आधी २०१४... नंतर २०१९... त्यानंतर आता सलग तिसऱ्यांदा मोदी ३.० च्या पर्वाला सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदींनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. मी नरेंद्र दामोदर दास मोदी... असं म्हणत त्यांनी तिसऱ्यांदा गोपनियतेची शपथ घेतली. त्यांच्यासोबत एनडीएच्या ३६ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेत आहेत. दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात शपथविधी सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी देशभरातून आणि जगभरातून पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील ७१ मंत्र्यांनी शपथ घेतली मोदी ३.० कॅबिनेटमध्ये ३० कॅबिनेट मंत्री, ५ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्री शपथ घेतली.



नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. नरेंद्र मोदी यांनी गोपनियतेची शपथ घेतली आहे. त्यांच्यासोबत एनडीएच्या काही दिग्गज नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. यात राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, जेपी नड्डा, निर्मला सीतारामन, शिवराज सिंह चौहान यांचा समावेश आहे. भाजप नेते अमित शहा यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. यापूर्वीच्या सरकारमध्ये अमित शहा केंद्रीय गृहमंत्री होते. ते चार वेळा गुजरातचे आमदार होते. गांधीनगर मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा खासदार झाले. राजनाथ सिंह यांनी मोदी ३.० कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. राजनाथ सिंह मागील सरकारमध्ये संरक्षण मंत्री होते. ते लखनौचे नवनिर्वाचित खासदार आहेत.



भाजप नेते आणि नवनिर्वाचित खासदार नितीन गडकरी यांनी सलग तिसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. गडकरी हे मोदींच्या मागील दोन्ही सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते. त्यानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. निर्मला सीतारामन यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. एस जयशंकर यांनी नवीन सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनी मोदी ३.० कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. नरेंद्र मोदींच्या शपथविधी सोहळ्यात शेजारील देश आणि इतर देशांतील अनेक नेते सामील झाले. यात श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइझ्झू, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफिफ, भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे, नेपाळचे पंतप्रधान पुष्पाजी. कमल दहल 'प्रचंड', मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ यांनी उपस्थिती लावली होती. तसेच भारतातील अनेक दिग्गजांनीही या शपथविधी सोहळ्याला उपस्थिती लावली होती. यात सुपरस्टार रजनीकांत, गौतम अदानी,राजनाथ सिंह, कंगना रणौत यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## भारताची दमदार कामगिरी, खेळाडूंनी दाखविली बहादूरी

**न्यूयॉर्क/वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत आज भारत-पाकिस्तानमध्ये चुरशीची लढत रंगली. प्रथम फलंदाजी करताना भारताची घसरगुंडी झाली. एकानंतर एक विकेट गमावल्याने निर्धारित षटकांत भारताला ११९ धावाच काढता आल्या. त्यामुळे भारताला पराभवाचा सामना करावा लागणार, असे चित्र होते. परंतु भारताचा वेगवान गोलंदाज बुमराहने कमाल केली आणि पाकिस्तानी फलंदाजांवर पकड निर्माण करीत त्यांना ११३ धावांपर्यंतच रोखले. त्यामुळे कमी धावसंख्या असतानाही भारताचा ६ धावांनी विजय झाला. या विजयामुळे भारताची घोडदौड कायम राहिली.

भारत-पाकिस्तान सामन्यात टॉस जिंकून पाकिस्तानने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. परंतु पावसाच्या व्यत्ययामुळे मॅच थांबला. भारताकडून रोहित शर्मा आणि विराट कोहलीने डावाची सुरुवात केली. पण भारताचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद झाले. विराट ४ तर रोहित शर्माने १३ धावा केल्या.




विराट कोहली सलग दुस-या मॅचमध्ये मोठी धावसंख्या उभारु शकला नाही. भारताच्या दिग्गज खेळाडूंनी विराट कोहलीला सलामीला पाठवण्याऐवजी यशस्वी जयस्वालला सलामीला पाठवावे, असा सल्ला दिला होता. मात्र, भारतीय संघाने रणनीती बदलली नव्हती. त्याचा मोठा फटका टीम इंडियाला बसला. कारण पाकिस्तानविरुद्ध आज टीम इंडियाची हराकिरी पाहायला मिळाली. परंतु भारतीय गोलंदाजांनी भेदक मारा केल्यामुळे पाकिस्तानचे फलंदाज आपली कमाल दाखवून देण्यात अपयशी ठरले. त्यामुळे साधारण लक्ष्य असतानाही पाकिस्तानला विजय मिळवता आला नाही.

### विराट सलामीला अपयशी

**विराट कोहली वर्ल्डकपमधील दोन्ही सामन्यात सलामीला आला. परंतु त्याला धमाकेदार सुरुवात करता आली नाही. विराटने वर्ल्डकपमधील आयरलँडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात १ रन केला होता तर आज पाकिस्तानविरुद्ध ४ धावा करू शकला. या दोन्ही मॅचमध्ये विराट कोहलीला सलामीला पाठवण्याची रणनीती चुकल्याचे स्पष्ट झाले. आता अमेरिकेविरुद्धच्या मॅचमध्ये भारतीय संघ रणनीती बदलणार का, हे पाहावे लागेल.**

## कर्तव्यदक्ष गजानन भातलवंडे यांना राष्ट्रपतिपदक प्रदान

**लातूर/प्रतिनिधी**

पोलीस उपअधीक्षक गजानन लक्ष्मीकांतराव भातलवंडे मुख्यालय, लातूर यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राज्यपाल श्री रमेश बैस यांचे शुभहस्ते दिनांक ६ जून रोजी दरबार हॉल राजभवन मुंबई येथे शानदार सोहळ्यात राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले.

गजानन भातलवंडे हे सन १९९३ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक या पदावर नेमणूक झाल्यानंतर त्यांच्या सेवा कालावधीत भंडारा, गोंदिया या नक्षलग्रस्त भागासोबतच नांदेड, बीड, परभणी, लातूर या ठिकाणी सेवा बजावली आहे. गजानन भातलवंडे यांनी यापूर्वी लातूर



पोलीस दलात स्थानिक गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून उत्तम कामगिरी बजावली आहे. गजानन भातलवंडे यांना पोलीस दलातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल यापूर्वी विशेष सेवा पदक, आंतरिक सुरक्षा पदक तसेच माननीय पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह त्यांना प्रदान करण्यात आले आहे. आजपर्यंतच्या सेवा कालावधीत गजानन भातलवंडे यांना ६५० बक्षिसे आणि ५१ प्रशंसापत्र मिळालेली आहेत. गजानन भातलवंडे यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल मानाचे राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक लातूर, अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी तसेच लातूर पोलीस दलातर्फे व नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

## पालकांनी आपल्या मुलांना गुणवत्तेसह सामाजिक बांधिलकीचे संस्कार द्यावेत

### पं.स.चे माजी सदस्य प्रकाश मिरगे

**लातूर/प्रतिनिधी**

प्रत्येक आई-वडीलांनी आपल्या मुलांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच, सामाजिक जाणिव आणि बांधिलकीचे संस्कार आवश्य द्यावेत, असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सदस्य श्री प्रकाश मिरगे यांनी केले. ते ५ जुन रोजी नाथनगर लातूर येथे, महाराष्ट्र राज्य परिट-धोबी संघटनेच्यावतीने, आयोजित करण्यात आलेल्या



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी, प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री प्रकाशराव सुरवसे हे होते. यावेळी बोलताना श्री मिरगे

(पान २ वर)

## महाराणा प्रतापसिंह यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन!




**मुंबई/प्रतिनिधी**

हाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती दिनानिमित्त सामान्य प्रशासन विभागाचे अव्वर सचिव रविंद्र पेटकर यांच्या हस्ते मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी घनश्याम जाधव, सहाय्यक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, नितीन राणे आदि उपस्थित होते.

## ट्रॉफिक अँबेसेडरच्या सतर्कतेमुळे जिल्हा प्रशासनाने वेळीच दखल घेतल्याने मुक्ताई नगरातील दुर्घटना टळली!









**लातूर/प्रतिनिधी**

दि.६ रोजी अंबाजोगाई रोड मुक्ताईनगर आदित्य संस्कृती अपार्टमेंट, लातूर. रोडवरील संततधार पावसामुळे सायंकाळी साडेसहा वाजायच्या सुमारास रस्त्यालगत जोपासलेले मोठे वृक्ष मुळासकट कोलमोडत असताना मोठा आवाज आला. एलआयसी चे अधिकारी संजय जी. जगताप यांच्या कानी पडला. लागलीच ट्राफिक आंबेसेडर व पत्रकार शिरीषकुमार शेरखाने यांना बोलावून घेतले. तेथून गतिमान चक्रे फिरली. तसे पाहता एनसीआयबीचे अधिकारी म्हणून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले आणि माझं लातूर परिवारातील परिचित असलेले शिरीषकुमार शेरखाने यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे मॅडम, महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, यांना मेसेज द्वारे खबर से हकीकत तकमाध्यमातून संदेश पाठवला. लागलीच अधिकारी यांनी दखल घेऊन, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे व महानगरपालिकेचे उपायुक्त क्यातमवार विविध ताप्यासह घटनास्थळी हजर होऊन प्रत्यक्ष कामाला लागले. आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशामक दल, महावितरण विभाग, महापालिकेचे विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, यांनी अथक परिश्रमातून मोठी कामगिरी बजावून दुर्घटना टळली. हे सर्व तब्बल दोन तास संततधार पावसात कार्य पार पाडले. हे मोठे वृक्ष मुळासकट कोलमडून केबल व तारेवर अडकले होते, ते कधी कोसळेल, याच्यावर ट्राफिक आंबेसेडर लक्ष ठेवून होते, हे करत रस्त्यावरील जा-ये करत असलेल्या वाहनावर लक्ष ठेवून वाहतूक कंट्रोल करत, दुसऱ्या मार्गाने वाहतूक वळवून, मोठी कामगिरी बजावली. या कामी महानगरपालिकेचे उपायुक्त क्यातमवार, तसेच बंडू किसवे, समाधान सूर्यवंशी, तापकिरे व संबंधित स्टाफ, विद्युत महावितरणाचा स्टाफ, आपत्ती व्यवस्थापन विभाग, धनराज कांदे, फायरमन रणखांब संदीप, शिवकुमार स्वामी, वाहन चालक कृष्णा दिवे, आदित्य संस्कृती अपार्टमेंट येथील डॉ. धूत,ॲड. तापडिया, मुस्कावाड, मुक्तापुरे, नारायणमामा, टील्लू दिलीप पडीले, आदींचे सहकार्य लाभले.

## चाकूर येथील पोलिस हवालदार लाच घेताना अडकला जाळ्यात

**चाकूर/प्रतिनिधी**

शेतीच्या बांधावरील झाड तोडल्याच्या कारणावरुन झालेल्या वादात अटक न करण्यासाठी तक्रारदाराकडून वीस हजार रुपयांची लाच स्वीकारताना चाकूर येथील पोलिस हवालदारास पंचासमक्ष लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक



विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले.

या प्रकरणातील तक्रारदार यांनी त्यांच्या भावकीतील अंगद शिवाजीराव चव्हाण व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांच्या शेतीतील सामायिक बंधा-यावरील झाड तोडल्याच्या कारणावरून भांडण झाले. यानंतर अंगद चव्हाण यांच्या फिर्यादीवरून तक्रारदार व त्याचे वडील यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे चाकूर येथे गु.र. न. २४५/२०२४ कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६, ३४ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांनीही अंगद चव्हाण व त्यांच्या नातेवाईकाविरुद्ध गु. र.नं. २४६/२०२४ कलम ३२३, ३२४, ५०४, (पान २ वर)

## दयानंद विज्ञानमध्ये वीर योद्धा महाराणा प्रतापसिंह व वैज्ञानिक हर्मन फेहलिंग यांची जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी**

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०९ जून २०२४ रोजी वीर योध्दा महाराणा प्रताप सिंह तसेच वैज्ञानिक हर्मन फेहलिंग यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी पर्यवेक्षक डॉ. संध्या कोल्हे यांनी महान योध्दा महाराणा प्रताप सिंह व वैज्ञानिक हर्मन फेहलिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



प्रा. व्यंकट कैले यांनी महान योध्दा महाराणा प्रताप सिंह त्यांच्यासमोर आव्हाने असूनही, त्यांनी कधीही स्वातंत्र्याचा लढा सोडला नाही आणि १५९७ मध्ये त्यांचा मृत्यू होईपर्यंत मुघलांचा प्रतिकार करणे सुरूच ठेवले.

ते भारतातील राजपूत अभिमान आणि शौर्याचे प्रतीक आहेत, ज्यांना भारतीय इतिहासातील एक महान व्यक्ती म्हणून स्मरणात ठेवले जाते आणि ज्यांना शौर्य आणि देशभक्तीसाठी ओळखले जाते त्यांना विनम्र अभिवादन करून सर्वांना जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.

तसेच पर्णवी ढवारे या विद्यार्थीनींने हर्मन फेहलिंग यांच्या बद्दलची माहिती देताना हे जर्मन रसायनशास्त्रज्ञ जे साखरेच्या अंदाजासाठी वापरल्या जाणाऱ्या फेहलिंगच्या द्रावणाचे विकसक म्हणून प्रसिद्ध होते.

त्यामुळे संशोधनात असलेले त्यांचे योगदान प्रकाश झोतात आणले. याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर, पर्यवेक्षिका डॉ. वैशाली पाटील,डॉ. महादेव पंडगे,डॉ.कोमल गोमारे, प्रा.मनीषा बाजपाई,प्रा.व्यंकट कैले,प्रा. आशाकांत भालेराव,सुदाम सातपुते,सतीश तांदळे,अश्विनी ढवारे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## लातूर लोकसभा मतदारसंघात उत्तम नियोजन केल्याबद्दल ॲड.किरण जाधव यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या लातूर (४१) लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे विजयी झाले असून त्यांनी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांचा पराभव केला आहे.



या विजयामध्ये माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री तथा पालकमंत्री आ. अमित देशमुख तथा आ. धीरज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर शहर जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा न्यायालयातील विधीज्ञ ॲड. किरण जाधव यांनी कायदेशीर बाबी तथा नियोजनाची जातीने अंमलबजावणी केल्यामुळे विजय सुखर झाला. खा.डॉ. काळगे यांच्या या विजयातील योगदानाबद्दल मित्र परिवाराच्या वतीने लातूर जिल्हा न्यायालयातील (पान २ वर)

## संपादकीय....

# प्रदुषणाला वेळीच रोखा!

'सगळ्यात प्रदूषित', 'भीषण' वगैरे विशेषणे ज्या शहरातील हवेच्या संदर्भात वापरली जातात त्या नवी दिल्ली शहरातही चमत्कार घडला आहे. टाळेबंदीमुळे निवांत असलेले दिल्लीचे रस्ते आणि वाहने यांमुळे दिल्लीचा आसमंत प्रदूषणविरहीत झाला आहे. हवेच्या गुणवत्तेची पातळी कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात सुधारली आहे. एरव्ही दिल्लीच्या हवेत प्रचंड प्रमाणात कार्बन मोनॉक्साइड, धूर आणि धूळ असते, ज्यामुळे येथील हवा कायमस्वरूपी प्रदूषित असते. हवेतील प्रदूषणाचे प्रमाण २.५ पीएम एवढे असते. टाळेबंदीमुळे मात्र दिल्लीतील हवा इतरांना हेवा वाटावी, एवढी शुद्ध झाली आहे. तसेच हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांकही (एक्यूआय) सुधारला आहे.

केवळ दिल्लीकरच स्वच्छ आणि शुद्ध हवेची अनुभूती घेत आहेत असे नाही. देशात इतरत्रही हीच परिस्थिती आहे. पंजाबातील जालंधर येथून २०० किमी अंतरावर असलेल्या हिमाचल प्रदेशातील हिमालयाच्या रांगा दिसायला लागल्याचा संदेश व्हॉट्सऍपवरून सर्वत्र पसरवला गेला. आणि सुखद आश्चर्याचा धक्का म्हणजे हा संदेश, ती ध्वनिचित्रफीत खरी होती! या एका उदाहरणावरून संपूर्ण देशातीलच हवेच्या प्रदूषणात घट झाल्याचे स्पष्ट निदर्शनास आले. एरव्ही ज्या सर्वाधिक प्रदूषित स्थळांवर दाट धुरक्याची चादर असायची त्या ठिकाणी आता स्वच्छ हवा अनुभवायला येऊ लागली आहे. देशवासीयांना हा सुखद अनुभव खूप वर्षांनी अनुभवायला मिळत आहे. मात्र, ही परिस्थिती कायम राहावी असे वाटत असेल तर या कोरोना संकटातही आपण या सुसंधीकडे लक्ष द्यायला हवे. हवेच्या शुद्धतेकडे गांभीर्याने पाहायला हवे. एरव्ही ज्या सर्वाधिक प्रदूषित स्थळांवर दाट धुरक्याची चादर असायची त्या ठिकाणी आता स्वच्छ हवा अनुभवायला येऊ लागली आहे. देशवासियांना हा सुखद अनुभव खूप वर्षांनी अनुभवायला मिळत आहे. मात्र, ही परिस्थिती कायम राहावी, असे वाटत असेल तर या कोरोना संकटातही आपण या सुसंधीकडे लक्ष द्यायला हवे. हवेच्या शुद्धतेकडे गांभीर्याने पाहायला हवे. २००३ मध्ये कॅलिफोर्निया विद्यापीठाने केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षाचेच प्रतिबिंब वरील अभ्यास अहवालात दिसून येते. २००३ मध्ये चीनमध्ये सार्सने (सिव्हिअर ऍक्युट रेस्पिरेटरी सिण्ड्रोम) धुमाकूळ घातला होता. सार्सने चीनमध्ये अनेकांचे बळी घेतले होते. कॅलिफोर्निया विद्यापीठाने त्या दरम्यान केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, ज्या चिनी शहरांमध्ये हवेतील प्रदूषणाचे प्रमाण खूप होते त्या शहरांमध्ये सार्समुळे मृत्यूमुखी पडणा–यांची संख्याही लक्षणीय होती. त्यामुळे देशातील ज्या राज्यांत किंवा भागांत हवेची गुणवत्ता अत्यंत खराब आहे त्यांच्यासाठी ही चिंतेची बाब आहे. प्रदूषित हवेशी जेवढ्या मोठ्या प्रमाणात संपर्क तेवढा कोरोनाचा धोका सर्वाधिक, असे प्रमाण आहे. दिल्लीप्रमाणे ज्या शहरांमधील लोक मोठ्या प्रमाणात प्रदूषित हवेला सरावलेले असतात त्यांची श्वसन यंत्रणा कमकुवत असते, आणि त्यामुळेच अशा परिस्थितीक कोरोनाबाधित झाल्यास मृत्यूमुखी पडण्याचा धोका जास्त असतो. मग त्यात अगदी निरोगी लोकांचाही– तरुण, नियमित व्यायाम करणारे, पोषक आहार वगैरे घेणारे –समावेश असू शकतो. या बाबतीत भारतातील परिस्थिती अगदीच यथातथा आहे. कोलकातास्थित चित्तरंजन नॅशनल कॅन्सर इन्स्टिटय़ूटने (सीएनसीआय) केलेल्या अभ्यासात दिल्लीतील ४ ते १७ वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमधील श्वसनप्रक्रिया आणि फुफ्फुसांचे कार्य देशातील याच वयोगटातील इतर शालेय विद्यार्थ्यांच्या तुलनेत अगदीच कमकुवत असल्याचे आढळून आले. हे प्रमाण इतरांपेक्षा दुप्पट ते चौपट आहे आणि यात कोणत्याही प्रकारची सुधारणा होण्याची सूतराम शक्यता नाही. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला कोलदांडा घालू शकेल इतपत धोकादायक हा प्रकार आहे. माननीय पंतप्रधानांनी देशव्यापी टाळेबंदी लागू करताना देशाला उद्देशून केलेल्या भाषणात १८व्या शतकातील प्रख्यात उर्दू कवी मीर तकी मीर यांच्या 'जान है तो जहाँ है' या काव्यपंक्ती उदधृत केल्या होत्या. सातत्याने खालावत जाणारी हवेची गुणवत्ता आणि त्याच्या जोडीला कोव्हिड–१९ यांचे अनिष्ट आर्थिक परिणाम होऊ शकतात, याची जाण धोरणकर्त्यांना आहे. त्यास २०१३ मध्ये जागतिक बँकेने सादर केलेल्या अभ्यास अहवालाची जोड आहे. हवेतील प्रदूषणामुळे कल्याणकारी योजनांवरील खर्च आणि कामगारांचा बुडालेला रोजगार या सगळ्याचा बोजा सरकारवर पडून भारताच्या जीडीपीवर त्याचा परिणाम होईल आणि ८.५ टक्क्यांनी जीडीपी घसरेल, असे या अभ्यास अहवालात नमूद करण्यात आले होते. हवेतील प्रदूषणामुळे कामगारांच्या बुडालेल्या रोजगाराचे प्रमाण (उदाहरणार्थ एकूण मनुष्य दिवस) एका वर्षात सुमारे ५५.३९ अब्ज डॉलर एवढे होते. तसेच आकस्मिक मृत्यूंमुळेही देशाचे ५०५ अब्ज डॉलर एवढे नुकसान होते जे जीडीपीच्या ७.६ टक्के एवढे आहे.दुस–या शब्दांत सांगायचे झाल्यास विषारी वायू हा एक प्रकारचा शांततेत येणारा यमदूत आहे आणि भारतात आजघडीला हवेची गुणवत्ता अतिशय घसरलेली आहे. हळूहळू ही प्रदूषित हवा देशाला आपल्या कवेत घेत असून अंतिमतः विनाशाकडे घेऊन जाणार आहे. असे सर्व धोक्याच्या पातळीवर असूनही कोणालाही त्यातले गांभीर्य लक्षात आलेले नाही. हवेच्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना आखण्यात आलेल्या नाहीत. त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. अगदी टोकाची टीका झाल्यानंतर विद्यमान सरकारने थोडी हालचाल करत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाची (एनसीएपी) घोषणा केली. या कार्यक्रमाच्या वार्षिक पहिल्या गोलमेज परिषदेचे आयोजन (एअर क्वालिटी एशिया या शीर्षकाखाली) मी केले होते ज्याची मी गेल्या तीन वर्षांपासून मागणी करत होतो. एनसीएपीच्या माध्यमातून हवेची प्रदूषण पातळी कमी करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल स्तुत्य आहे. परंतु तेवढेच पुरेसे नाही. निदान कागदोपत्री तरी देशातील काही शहरांमध्ये हवेतील प्रदूषण कमी करण्याचे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. भारताने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाची संकल्पना चीनच्या राष्ट्रीय वायू प्रदूषण कृती आराखड्यावरून उचलली आहे. या कार्यक्रमांतर्गत चीनने प्रदूषणाला आळा घालण्यासाठी अतिशय कठोर अशी नियमावली तयार केली आणि तेवढ्याच कठोरतेने या कार्यक्रमाची अंमलबजावणी करून आपल्या प्रमुख शहरांमधील वायू प्रदूषणाची पातळी विक्रमी वेळेत कमी करून दाखवली. भारताने मात्र चीनच्या या कार्यक्रमाची सहीसही नक्कल करण्यापलीकडे काहीही केलेले नाही. एक गोष्ट मात्र आहे की, भारतीय समाजातील नागरी संस्थांची संपत्ती आणि संबंधित विषयावरील तंत्रज्ञ हे सर्व लक्षात घेता ही योजना आणि तिचे लक्ष्य यासंदर्भात फारच मर्यादित प्रमाणात सार्वजनिक सल्ला घेण्यात आला. घोषित झालेली योजना (योजनेत फक्त १०२ शहरांचाच समावेश करण्यात आला आहे, जेव्हा की ग्रीनपीसच्या 'एअरपोकॅलिप्स'तर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ३१३ भारतीय शहरांपैकी किमान २४१ शहरांमधील हवेची गुणवत्ता फारच वाईट असल्याचे स्पष्ट केले होते) आणि त्यासोबत असलेले निर्विकार लक्ष्य (२०१४ पर्यंत पीएम २.५ आणि पीएम १० यांचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट योजनेत आखण्यात आले आहे. परंतु पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या मते निवडण्यात आलेल्या निम्म्या शहरांच्या हवेत राष्ट्रीय प्रमाणाएवढी सुधारणा होणार नाही, जागतिक आरोग्य संघटनेने आखून दिलेली आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे हवेची प्रत सुधारणे तर दूरच राहिले ) यांबाबतची मर्यादित प्रमाणात पूर्वकल्पना असती तर वर उल्लेख केलेले गट त्यांच्या यासंदर्भातील चिंता व्यक्त करण्यासाठी काहीएक प्रक्रिया राबवू शकले असते




# नवोन्मेष आणि सामर्थ्यांचे प्रतिक: वर्षा ठाकूर-घुगे

**विकासाचा केंद्रबिंदू मानून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी विविध कामाच्या माध्यमातून लातूर जिल्हयाला नवा आयाम दिला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आखून दिलेल्या कामामध्ये अधिकारी आणि कर्मचारी उत्साहाने काम करतात, त्यामुळे कामकाजाला गती मिळते. लातूर जिल्ह्याच्या ४० वर्षाच्या प्रशासकीय कारभारात जिल्हाधिकारी म्हणून प्रथमच एका महिलेच्या हाती कारभार देण्यात आला आहे. कर्ता चांगला असेल तर प्रगतीचा मार्ग गतिमान होतो, हे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी लातूरकरांना दाखवून दिले आहे. वर्षा ठाकूर–घुगे ह्या दिनांक २३ जुलै २०२३ रोजी जिल्हाधिकारी म्हणून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्या. त्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून आपला ठसा उमटवला आहे. केवळ आठ महिन्यात अधिकारी, कर्मचारी व जनतेमध्ये त्यांनी चांगले ऋणानुबंध निर्माण केले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी त्यांच्या संपूर्ण टीमच्या विश्वासाच्या जोरावर आव्हानात्मक भूमिका पार पाडत आहेत.**

शिक्षणातील विविध टप्पे ओलांडत, प्रशासकीय सेवेत यशस्वी प्रवेश करत, सक्षमपणे अधिकारीपदाची धुरा सांभाळणाऱ्या वर्षा ठाकूर मराठवाड्याच्या पहिल्या महिला जिल्हाधिकारी ठरल्या आहेत. ठाकूर यांचे शिक्षण भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये झाले. तिथूनच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. प्रशासनातील कर्तव्यदक्ष आणि सक्षम महिला अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचे नाव लौकिक आहे. ठाकूर यांनी बजावलेल्या बालकामगार प्रकल्पाच्या प्रमुख म्हणून केलेल्या कामगिरीची विशेष नोंद शासन व आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेतर्फे घेतली गेली होती. नांदेड जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी म्हणून कार्य बजावतांना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून राज्यात नांदेडला बहुमान मिळवून दिला. लातूर जिल्हयातही जिल्हाधिकारी म्हणून वर्षा ठाकूर–घुगे यांनी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. दैनिक लोकसत्ता जिल्हा निर्देशांक पॅरामीटर्समधील कृषी, आरोग्य, शिक्षण, वाणिज्य आदी क्षेत्रातील जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी उत्कृष्ट कामगीरी केल्याबद्दल विकास निर्देशांकात लातूर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आला. यानिमित्त मुंबई येथे झालेल्या सोहळ्यात त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनाच्या आदल्या दिवशी १ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास हा उपक्रम लातूर जिल्हयात राबवला. यामध्ये स्वच्छता व सफाई या बाबींवर लक्ष केंद्रीत केले होते. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती क्षेत्र, ग्रामीण भागातील बसस्थानके, पर्यटन स्थळे, वारसास्थळे, नदी किनारे, नाले आदी ठिकाणी अभियानांतर्गत स्वच्छता मोहिम राबवल्याने मोठया प्रमाणात स्वच्छता झाली. तसेच मुंबई–ठाणेच्या धर्तीवर नागरीकांच्या सहभागाने ई– कचरा संकलन तसेच स्वच्छतेसाठी हाती घेतलेला दशसुत्री प्रभावी ठरत आहे. यामध्ये मंदिराला जोडणारे रस्ते, मंदिर परिसर, किल्ले, बारव यांना जोडणारे रस्ते आणि आजुबाजुचा पाचशे मीटरपर्यंत विशेष स्वच्छता मोहिम शहराच्या विकासाठी महत्वाचा टप्पा आहे.

संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या रूपाने जिल्हयातील पहिल्या दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन करुन दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्याच्या उपक्रमात हाती घेतला. लातूर येथे झालेल्या विभागीय स्तरावरील नमो महारोजगार मेळाव्यात सुमारे ४ हजार ३४८ हून अधिक उमेदवारांना नोक–यांची ऑफर मिळाली आहे. ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून अनेकांना लाभ मिळाला आहे. रोजगार निर्मितीचा लातूर पॅटर्न राज्यात निर्माण करण्याचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–यांना मानस आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी महसूल वसुलीला प्राधन्य दिले. त्यांनी आखलेल्या नियोजनातून महसूल वसुलीचे १०६ टक्के उदिष्ट साध्य झाले आहे. ७० कोटी ९९ लाख रुपयांची महसूल वसुली शासनास जमा करण्यात आली आहे. तसेच महसूल सप्ताहादरम्यान लातूर जिल्हयात युवा संवाद, मदत एका हाताने, सेवा अधिकारी व कर्मचारी संवाद, महसूल न्यायालय, लोकसंवाद, लष्करी संवाद आदी उपक्रम त्यांनी घेतले. निवडणूक ते नैसर्गिक आपत्ती या प्रत्येक बाबतीत महसूल विभागाची प्रमुख भूमिका आहे. सर्वसामान्य जनतेला योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील प्रशासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यालयात समस्या घेऊन येणा–या नागरिकांशी सुसंवाद ठेवून, यांनी तक्रार केवळ कागद म्हणून न वाचता ती तक्रार मानवी दृष्टीकोन ठेवून समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचा पुढाकार असतो.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियानाला त्यांनी गती दिली. जिल्हयातील १०३ तलावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यासाठी १२ कोटी रूपये मंजूर करण्यात आले. ज्यामुळे ३५ लाख घनमीटर गाळ काढून जिल्हयातील शेतक–यांच्या जमीनी सुपीक होणार आहेत. मागच्यावर्षी लातूर जिल्हयात कमी पाऊस झाल्याने जिल्हयात झालेल्या पाणी टंचाईचा समाना करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केलेले सुक्ष्म नियोजन प्रभावी ठरले. त्यांनी उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवला. जलाशयांमधून अवैध उपसा थांबविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली. तसेच पावसाळ्यापूर्वी मोठया प्रमाणात वृक्षलागवड, जलसंधारणाची कामे, भूजल पुनर्भरण आदीचे नियोजन केले. जंगलातील पुर्नवनीकरण योजनेत १५ हेक्टरवर रोपांची लागवड, पाणी व मातीची धूप रोखण्यासाठी वॉटर हार्वे स्टिंग व कॉन्टूर ट्रेंचिंक आदी उपक्रम हाती घेतले.

महिला सक्षमीकरणासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांचा नेहमीच पुढाकार असतो. त्यांनी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर स्त्री–शक्ती सन्मान शिबिराचे आयोजन करुन जिल्हयातील दहा तालुक्यामध्ये १ हजार ६८० महिलांशी संर्पक साधून त्यांना प्रमाणपत्र व इतर योजनांचा लाभ दिला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेत जिल्हयातील एक पालक, अनाथ, अंपग अशा एकूण २ हजार २४१ मुलांना दरमहा २२५० रुपये अनुदान दिले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हयात कार्यक्रमाचे आयोजन करुन महिला सक्षमीरणावर भर दिला. याशिवाय क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, महिला स्वयंसहाय्यता गटांना प्रशिक्षित करून त्यांना उद्योजक बनविणे, रेशीम उद्योगाला चालना देणे, अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी तसेच विविध योजनेचे लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे, श्रावण बाळ योजनेला प्राधान्य देणे, पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेणे, हेरिटेज वॉक उपक्रम, पर्यटन व पारंपरिक वारसा जोपासण्यासाठी पुस्तकाची निर्मिती अशा कितीतरी बाबींवर लातूर जिल्ह्याचे नाव राज्याच्या नकाशावर आणण्याचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचा माणस आहे.

खरं तर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घूगे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण करणा–या अधिकारी आहेत. त्या सतत जिल्हाभरात फिरून कामाचा आढावा घेतात. त्यांची काम करण्याची हातोटीच निराळी आहे. जे काम हाती घेतले ते काम वेळेत पूर्ण करून दाखतात. त्यांचा लोकांशी असेलेला संवाद, अधिकारी व कर्मचाऱ्यांची अडचणी समजून त्या सोडवणे व त्यांना मार्गदर्शन हा त्यांचा नित्यांचाच भाग आहे. आपल्या कामातून ठसा उमटवणा–या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचा आज वाढदिवस त्यानिमित्त त्यांना लाख–लाख शुभेच्छा.

**– मिलिंद व्यवहारे,**
नांदेड – ८६२६०२५८२५

# 'ज्ञान' आणि 'शील' नाकारणे आत्मघात ठरू शकेल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांना महत्वपूर्ण असे अनेक वैचारिक ग्रंथ दिले आहेत. त्यामुळे आपल्या देशाचे वैचारिक आरोग्य हे अत्यंत संपन्न व सक्षम आहे. विशेष म्हणजे त्यांनी देशवासियांना राज्यघटना तरी दिलीच. पण त्याच सोबत त्यांनी प्रदीर्घ अभ्यास व चिंतन करून आणि अफाट मेहणत घेऊन, माणवी समाजाला ' बुद्ध आणि त्यांचा धम्म ' हा एक विवेकी व विज्ञानवादी संस्कारक्षम संदर्भग्रंथ आपल्या भारतीयांना दिला. या दोन्ही निर्मितीसाठी त्यांनी भयंकर कष्ट उपसले.

यामध्ये त्यांनी बुद्धाचे सर्वोच्च तत्वज्ञान उत्तम रितीने प्रभावीपणे मांडले. आणि बुद्धासारखा एक महान आंतरराष्ट्रीय दार्शनिक आपल्या राष्ट्रासमोर मोठ्या ताकदीने प्रस्तुत केला. अर्थात बाबासाहेबांचे हे पण एक श्रेष्ठ असेच कार्य ठरले गेले. मात्र एवढ्या विशाल आणि अजोड अशा मानवी तत्वज्ञानापासून, इथला आधुनिक व्यक्ती आणि समाज इतका दीर्घकाळ अनभिज्ञ वा दुर्लक्षित का व कसा राहिला ? हा अत्यंत वेदनादायी असा प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतर लोकशाही व संविधान नागरिकांहाती आले खरे. त्याप्रमाणे पुढे आपल्या आधुनिक समाजाला, ज्ञान– विज्ञान व मानवतावादी बुद्ध तत्वज्ञानाची ओढ अधिक लागावयास हवी होती. पण येथे तसे कांही घडले नाही. हे आपणास स्वीकारावेच लागते. माणसांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी, बौध्दिक व शारीरिक कठीण कष्ट उपसणारा, विश्वाच्या पाठीवर म. बुद्धासारखा थोर प्रज्ञावंत दुर्मिळच ठरलेला आहे. एवढेच नव्हे तर, म. बुद्ध हा जगातील एक सर्वश्रेष्ठ प्रथम समाजशास्त्रज्ञ व मनोवैज्ञानिक आहेत. बुद्धानीं अंतिम सत्य ज्ञानासाठी अतिशय दीर्घकाळ अभ्यास, निरीक्षण, मनन, चिंतन व विश्लेषण केले. माणूस दुःखमुक्त करण्यासाठी म. बुद्धांच्या नितीत्वाचा पाया हा चारित्र्य, ज्ञान आणि आचार– कृती हाच होता. म. बुद्ध हे स्वतः अगदी हाडाचे महान लोकशिक्षक पण होते. ते म्हणतात की, धर्माचा उद्देश हा सृष्टीच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण करणे आहे. मात्र धम्माचा उद्देश सृष्टीचे पुनर्रनिर्माण करणे हा आहे. सत्याच्या अस्तित्वासाठी बुद्धानी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रह धरला. ब्राह्मणवादाचा समतेच्या तत्वावर विश्वासच नव्हता. म्हणून बुद्धांनी ब्राह्मणवाद नाकारला. वेदाचे अध्ययन हे अविद्येचे अध्ययन आहे. या बाबतीत सर्व उपनिषेधांतील एक वाक्यतेचा हवाला देत, त्यांनी कल्पना विलासी उपनिषदांचे सिद्धांत अगदी निःसंकोच नाकारले.

शाक्य– कोलीय पाणी वाटप संघर्ष पेटला तेव्हा, सिद्धार्थ गौतम हे अवघे २८ वर्षाचे होते. पुढे त्यांनी गृहत्याग केला आणि प्रव्रज्या ग्रहण केली. वास्तविक पाहता त्यापूर्वीचा एक जो कौटुंबिक प्रसंग आहे, तो महाभंयकर व वेदनादायी आहे. त्यांची पत्नी यशोधरा म्हणते, तुमचा निर्णय योग्य आहे. माझी संमती आणि सहकार्य आहे. मीही प्रव्रज्या घेतली असती. पण राहूलचे संगोपन आहे. आम्ही धैर्याने व शौर्याने परिस्थितीचा सामना केला पाहिजे. तुम्ही माता–पित्याची व पुत्राची चिंता करु नका. जिवंत असे पर्यंत मी त्यांची काळजी घेते. त्या नंतर सिध्दार्थाने बाळ राहूलला पित्याच्या वात्सल्यपूर्ण नजरेने न्याहळले. आणि त्यांने पुढे कपिलवस्तू ते राजगृह हा ४०० मैल पायी प्रवास केला. आई– वडीलांची हालत तरी थोडी बाजुला ठेऊ या. पण या पती– पत्नीच्या संवादाने अक्षरशः पृथ्वी उन्मळून पडावी की काय ? असा तो गंभीर प्रसंग आहे. पण सिद्धार्थाला बुद्ध बनविण्यात, यशोधराचे फार थोर योगदान आहे.

मानवी प्रगतीचा भावी इतिहास या महान मातेस कायम वंदनशील असेल. गौतमाने समस्याचा नवीन दृष्टिकोनातून विचार सुरु केला. युद्धाची समस्या ही हितसंघर्षाची समस्या आहे. ती व्यापक व बृहत आहे. वर्ग संघर्ष हा निरंतर आहे. हेच या जगी वेदना आणि दुःखाचे मूळ कारण आहे. मला या सामाजिक संघर्षाच्या समस्येचे निदान शोधावयाचे आहे. बुद्धांनी परम शांतीचा शोध आणि पृथ्वी तलावरील दुःखाच्या अंतासाठी, ६ वर्ष भयंकर कठोर तपस्या केली. त्यातून कांहीही हाती आले नाही. त्यामुळे ते सर्व सोडून पुन्हा त्यानी ४ सप्ताह ध्यानसाधना केली. आणि अखेर त्यांना बुद्धत्व–ज्ञान प्राप्त झाले. एका नव्या धम्माचा अविष्कार बोधिसत्व सम्यक संबोधी त्यांना प्राप्त झाली. बुद्धांना विश्वास होती की, विचार स्वातंत्र्य हेच सत्याचा शोध घेण्याचा एकमेव मार्ग आहे. त्यांनी यज्ञाचा सिद्धांत त्याज्य मानला. बुद्धांनी प्रव्रज्या स्वीकारली त्याकाळी, देशात मोठे बौद्धिक आंदोलन सुरु होते. ब्राह्मणवादी दर्शनाशिवाय त्याकाळी ६२ अन्य दार्शनिक विचारधारा प्रचलित होत्या. पैकी ६ तरी दखल पात्र होत्या.

म. बुद्धांच्या शिकवणुकीचे प्रथम वैशिष्ट्ये म्हणजे, त्यांनी चित्ताला सर्व बाबींचा केंद्रबिदू म्हणून मान्यता दिली. चित्त मानसिक प्रवृतीची उत्पती आहे, असेही सांगीतले. चित्त साधना हे प्रथम साध्य आहे. म्हणून चित्ताची निर्मिती हेच धर्माचे सार आहे. बुध्दाचा धम्म हा सद्धम्म आहे आणि या पृथ्वीवर सद्धम्माचे राज्य स्थापन व्हावे, असा बुद्धाचा हेतू होता. बुद्ध मध्यम मार्गाचेच उपासक आहेत. त्यांच्या धम्ममार्गाचा ईश्वर व आत्म्याशी काहीही संबंध नाही. धम्माचा केंद्रबिंदू हा मनुष्य आहे. पृथ्वीवरील जिवंतपणी माणसा–माणसांतील संबंध हा मुख्य बिंदू आहे. दुःखाचा

(पान ३ वर)

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे नीट परिक्षा ...

(पान ४ वरून) विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पेढे देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक प्रा. व्ही. सी.पाटील, प्रा.एस.एम.पाटील, प्रा.डॉ.गुणवंत बिरादार, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. एम. डी. बोळेगावे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते. महाविद्यालयाने घेतलेल्या दर रविवारच्या सराव परीक्षेमुळे उज्वल यश मिळण्यासाठी मदत झाली. सर्व प्राध्यापकानी वेळोवेळी शंकांचे समाधान केले असे मत गुणवंत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

तसेच पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोर्ड समन्वयक प्रा.व्ही.सी.पाटील यांनी केले तर आभार प्रा.के. आर सूर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. अश्विनी रोडे, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशस्वीतेसाठी नंदू काजापुरे, राजाभाऊ बोडके, अशोक शिंदे, आनंद खोपे, ज्योतीराम वलांडे आणि राम पाटील यांनी परिश्रम घेतले.

## पालकांनी आपल्या मुलांना गुणवत्तेसह ...

(पान १ वरून) पुढे म्हणाले की, वाढत्या स्पर्धेमध्ये अपेक्षित संधीची शास्वती धुसर होत चाललीय. वाढत्या खाजगीकरणामुळे शिक्षण हे खूपच महागडे झालेय. तर बाजारू शिकवणी वर्गांची अलिखित सत्ती शिक्षण संस्थासह, स्वतः पालक वर्गाने पण स्वीकारलेली आहे. आणि मैदाना ऐवजी मुलांच्या हाती घातक मोबाईल खेळणी आली आहे. अशा अवाजवी व्यस्ततेमुळे मुलांचे आरोग्य असक्षम बनत आहे. शिवाय विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य व व्यक्तीमत्व विकासाकडे पण दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवून, त्यांना सेवाकार्य आणि सामाजिक जाणिवेचे संस्कार द्यावेत. तरच कुटुंब आणि समाजामध्ये समृद्धीसह, शांतता व प्रेमभाव वाढेल असेही श्री सुरवसे म्हणाले. प्रारंभी राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, सामूहिक अभिवादन करण्यात आले. चि. सर्वेस सुदाम तेलंगे या विद्यार्थ्याने दहावी बोर्ड परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे, श्री मिरगे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन आई– वडीलासह त्याचा हृद्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणपतराव तेलंगे यांनी केले. तर विवेकानंद चिंचोले यांनी सूत्रसंचालन केले. आणि सुदाम तेलंगे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी सविता तेलंगे, नरसिंग जाधव, चंद्रकांत तेलंगे, नरसिंग सुरवसे, सुमन तेलंगे, जालिंदर सुरवसे, मायादेवी तेलंगे, शांताराम वाघमारे, दिपाली तेलंगे, धनराज गरड, रामकुमार रायवाडीकर, सायली तेलंगे, दिपक तेलंगे व सोहम तेलंगे आदी उपस्थित होते.

## लातूर लोकसभा मतदारसंघात उत्तम ...

(पान १ वरून) वकील ॲड. संदीप हजगुडे यांच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ॲड. नामदेव काकडे, ॲड. विकास सुळ, ॲड. प्रदीप पाटील, ॲड. चंद्रकांत चोपडे, ॲड. विठ्ठल बोंबडे, ॲड. सूर्यवंशी, दैनिक अदिती एक्सप्रेसचे संपादक गंगाधर डिगोळे आदि उपस्थित होते.

## चाकूर येथील पोलिस हवालदार लाच घेताना अडकला ...

(पान १ वरून ) ५०६, ५०७, ३४ भा.द.वी. प्रमाणे क्रॉस गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपास कामात मदत करून गुन्ह्यात अटक न करण्यासाठी तक्रारदारांना आरोपी पांडुरंग दाडगे नेमणूक पोलिस ठाणे चाकूर व पोलिस उपनिरिक्षक दिलीप रघुत्तम मोरे यांनी २५ हजार रूपयांची लाचेची मागणी केली. दि. ४ जून २०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक दाडगे यांनी तक्रारदाराकडे २५ हजार रूपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २० हजार रुपये स्विकारण्याचे मान्य केले त्यास आरोपी मोरे यांनी लाच देण्यास प्रोत्साहन दिले. दि. ६ जून रोजी दाडगे यांनी तहसील कार्यालय चाकूर समोरील मोकळ्या जागेत, गेट नंबर २ च्या रस्त्यावर २० हजार रुपये लाचेची रक्कम शासकीय पंचासमक्ष स्वीकारली. असून आरोपी क्र १ दाडगे यास सापळा पथकाने लागलीच लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आरोपी मोरे यास पोलीस ठाणे चाकूर येथून ताब्यात घेतले असून चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास लाचलुचपतचे पोलिस अधिक्षक डॉ.राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी: संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक, तपास अधिकारी भास्कर मुळ्ळी हे करीत आहेत.



लातूरच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.वर्षा ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना एनसीआयबी अधिकारी शिरीषकुमार शेरखाने, ॲड.बसवेश्वर पसारे, वृक्षमित्र दयाराम सुडे




लातूरच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.वर्षा ठाकूर यांना वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे तुळस रोप भेट देऊन शुभेच्छा देताना प्रा.योगेश शर्मा.



माझं लातूर परिवाराच्या सदस्या व लातूरच्या लोकप्रिय जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी सौ.वर्षा ठाकूर-घुगे मॅडम यानां भारताचे संविधान देत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते उमेश कांबळे दिसत आहेत.




ज्ञानेश्वर कनिष्ठ विद्यालयाचे प्राचार्य संजय मलवाडे यांचा सत्कार करतांना ॲड.बालाजी पडीले व त्यांचे सहकारी दिसत आहेत.



'पोलीस फ्लॅश न्यूज' चे संपादक गणेश होळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना एनसीआयबी अधिकारी तथा पत्रकार शिरीषकुमार शेरखाने व इतर मित्र परिवार दिसत आहे.



लातूर लोकसभा मतदारसंघातून प्रचंड अशा मताधिक्याने डॉ.शिवाजी काळगे यांचा विजय झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना एनसीआयबी अधिकारी तथा पत्रकार शिरीषकुमार शेरखाने दिसत आहेत.

# ए.सी.पी.नानासाहेब उबाळे सेवानिवृत्त

भोकर : सोलापूर पोलीस आयुक्तालयात सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर कर्तव्य बजावून सहाय्यक पोलीस आयुक्त नानासाहेब उबाळे हे पोलीस दलात ३१ वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. नानासाहेब उबाळे यांनी पोलीस खात्यात ३१ वर्षाची सेवा पूर्ण करत असताना त्यांना अनेक खडतर प्रवासासही सामोरे जात संघर्ष करावा लागला.



त्यांनी त्यांची सेवा करत असताना पुढील शहरात मुंबई, धाराशिव, लातूर, नागपूर, नांदेड, भोकर, सोलापूर इत्यादी ठिकाणी त्यांनी त्यांची सेवा बजावली आहे. ते भोकर येथून मागील सहा महिन्यापूर्वीच पोलीस निरीक्षक या पदावरून सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर पदोन्नतीवर बदली होऊन सहाय्यक पोलीस आयुक्त सोलापूर येथे गेले होते ते दिनांक ३१ मे २०२४ रोजी नियत वयोमानानुसार पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर येथून पोलीस दलातून सेवानिवृत्त झाले आहेत.

सोलापूर पोलीस आयुक्त कार्यालय यांच्या वतीने त्यांचा सहपत्नीक सेवानिवृत्ती सत्कार समारंभ सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राज कुमार हे होते. उपस्थितांनी आपाआपले मनोगत व्यक्त केले मनोगत व्यक्त झाल्यानंतर सेवानिवृत्त सत्कारमूर्ती यांच्या पत्नी सौ. संतोषी उबाळे व नानासाहेब उबाळे यांचा सोलापूर चे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करून पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांना सेवानिवृत्ती व त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सोलापूरचे पोलीस उप आयुक्त ( गुन्हे शाखा) सोलापूर शहर चे दिपाली काळे व पोलीस आयुक्त कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांना राष्ट्रपती पोलीस पदक बहाल

**धाराशिव/प्रतिनिधी**

दि. ८ धाराशिव येथील जिल्ह्यातील अनेकजणांनी प्रशासकीय सेवेत गौरवास्पद कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. त्यात आणखीन जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी कामगिरी धाराशिव जिल्ह्याचे सुपूत्र व सहकार नगर, पुणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांनी केली आहे. त्यांनी पोलीस दलात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.



राजभवन मुंबई येथील दरबार सभागृहात ६ जून रोजी २०२२ च्या प्रजासत्ताक दिनी जाहीर झालेली पोलीस पदके महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते माळाळे यांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले. यावेळी गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्यासह पोलीस अधिकारी व गौरविण्यात आलेल्या पोलीस अधिकार्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे यांच्या रूपाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याने त्यांचे जिल्ह्यातील विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

धाराशिव शहरातील भीमनगर येथील ते रहिवाशी आहेत. स्मृतिशेष गजेंद्र आप्पाराव माळाळे व स्मृतिशेष मोहरबाई गजेंद्र माळाळे यांचे ते सुपूत्र आहेत. त्यांचे शालेय शिक्षण धाराशिव शहरात तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे झाले आहे. त्यांनी परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठातून बी.एसस्सी व एम.एसस्सी पदवी मिळविली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पहिल्याच परिक्षेत ते पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवडले गेले.

सन १९९५ मध्ये ते पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून रूजू झाले. त्यांनी आतापर्यंत नागपूर, गडचिरोली, सीआयडी गुन्हे शाखा, जालना पोलीस प्रशिक्षण, जालना स्थानिक गुन्हे शाखा आदी ठिकाणी आपले कर्तव्य बजावले आहे. माळाळे यांनी खून, दरोडे, घरफोडी आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे उघडकीस आणली आहेत. गडचिरोलीसारख्या नक्षलवादी भागात त्यांनी सतत उद्भवणारी गंभीर परिस्थिती मोठ्या हिंमतीने हाताळली आहे. सुरेंद्र माळाळे

यांना आतापर्यंत महाराष्ट्र शासनाचे स्वातंत्र्याचे ५० वर्षे पदक, खडतर सेवा पदक, अंतर्गत सुरक्षा पदक, डी. जी इन्सिगनिया अवॉर्ड, स्वातंत्र्याची ७५ वर्षे पदक, उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून पोलीस महासंचालकांचे प्रशस्तीपत्र, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोकडून उत्कृष्ट कार्याचे प्रशस्तीपत्र, २०२२ चे राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त आहेत.

## पेरणी योग्य पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये;कृषि विभागाचे आवाहन



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात १० जून २०२४ अखेर सरासरी ७२.१ मिलीमीटर पाऊस झालेला असून शेतकऱ्यांनी पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवा पेरणी करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे. जिल्ह्यात लागवडी लायक ६.६५ लाख हेक्टर क्षेत्र असून पेरणी योग्य क्षेत्र ६.४० लाख हेक्टर आहे. जिल्ह्यात सोयाबीन हे खरीपाचे प्रमुख पीक आहे. सोयाबीन पीकास पेरणीसाठी साधारणपणे ७५ ते १०० मिलीमीटर पावसाची (३ मोठे पाऊस) आवश्यकता असते. ज्या भागामध्ये अशा प्रकारचा पेरणी योग्य पाऊस झालेला नाही त्या शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे त्यांनी म्हटले आहे.

ज्या भागात पेरणी योग्य पाऊस झालेला आहे, अशा ठिकाणी पेरणी करताना बियाणे साधारणपणे २ ते ३ सेंटीमीटरपेक्षा खाली जाणार नाही, याची दक्षता घेऊन पेरणी करावी. बियाणे २ ते ३ सेंटीमीटरपेक्षा खाली गेल्यास बियाण्याची उगवण कमी प्रमाणात होत असल्यामुळे बियाणे वाया जाण्याची दाट शक्यता असते. या बाबत अधिक माहितीसाठी सबंधित कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक अथवा मंडळ कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या लातूर तालुक्यात ७८.६, औसा तालुक्यात ८६.९, रेणापूर तालुक्यात ८७.४, निलंगा तालुक्यात ६२.२, देवणी तालुक्यात ८०.४, उदगीर तालुक्यात ७४.१, अहमदपूर तालुक्यात ५१.४, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ६१.६, जळकोट तालुक्यात २५.८, चाकूर तालुक्यात ७६.९ मिलीमीटर पाऊस झालेला आहे.

# 'ज्ञान' आणि 'शील' नाकारणे आत्मघात ...

(पान २ वरून) विनाश हाच धम्माचा एकमेव हेतू आहे. पंचशीलासह, अष्टतत्व आणि दस पारमिता हा साधन मार्ग आहे. सद्गुणाचा पथ प्रज्ञेने प्रकाशित असलाच पाहिजे. प्रज्ञा म्हणजे विवेक. धम्मात ध्येय आणि आशा आहेत. धम्माचे ध्येय अविद्येचा नाश हाच आहे. दुःखाच्या अस्तित्वा विषयीच्या अज्ञानाचा नाश आहे. जगाच्या इतिहासात कोणत्याही धर्म संस्थापकांने, धर्माचा खरा आधार मानवी मानवी दुःख आहे, ही शिकवण दिली नाही. मुक्तीची याच जीवनात आत्मसाधना आणि आत्मसंयमाने चित्त परिवर्तन करून प्राप्ती होऊ शकते. अज्ञान मिश्रीत शास्त्र किंवा सिद्धांत बुद्धाला मान्य नाहीत. धम्म स्वसामर्थ्यावर जिवंत राहावा. धम्माचे अस्तित्व मानवीय अधिकारावर अवलंबून असू नये, असे ही ते म्हणतात. बुद्धांना मुक्ती म्हणजे निर्वाण हा अर्थ अभिप्रेत आहे. निर्वाण म्हणजे तृष्णा, राग, व्देष यांचा क्षय असेही ते म्हणतात. आरोग्या सारखा श्रेष्ठ लाभ नाही. संतोषा सारखे श्रेष्ठ धन नाही. नैतिक नियम ईश्वर निर्मित असतील तर, या सृष्टीत नैतिक अराजकता का विद्यमान आहे ? असा प्रश्न म. बुद्ध उपस्थित करतात. मानव मुक्त नसेल तर, त्याच्या अस्तित्वाचे प्रयोजन काहीही असत नाही. आणि परा प्राकृतिक कारणावर त्याची श्रद्धा असेल तर, त्याच्या बुद्धीवंत होण्याचे प्रयोजन काय ? अशा ती विचारणा ते करतात. मिथ्या विश्वास, अंधश्रद्धा या मानवाच्या सत्य शोधनाच्या प्रवृतीची हत्या करतात. ईश्वर आश्रित धर्म हा धर्मच नव्हे ! ईश्वराच्या अस्तित्वाचा सिद्धांत हा, सत्यावर आधारित नाही. अंधश्रद्धा ही सम्यक दृष्टीचा शत्रू आहे. आणि सम्यक दृष्टी ही आर्य अष्टांगिक मार्गाचे सर्वात महत्वाचे तत्व मानले जाते. आत्म्यासंबंधी बुद्धाचा सिद्धांत हा अनात्मवाद म्हणून प्रचलित आहे. बुद्धांनी धम्मामध्ये पंचशील, अष्टांगिक मार्ग व दस पारमितावर अधिक भर दिलेला आहे.

श्रमण गौतमाने स्वतः ला बहुजन हिताय समर्पित केले. त्यांने बहुजनांच्या कल्याणार्थ स्वतःला समर्पित केले. प्रज्ञा आवश्यक आहे. परंतु शील त्यापेक्षा अधिक महत्वाचे आहे. एवढेच नव्हे तर, शीलाविना प्रज्ञाही धोकादायक आहे, असे बुद्धानी बजावले आहे. करुणा म्हणजे मनुष्याप्रती प्रेम. पण म. बुद्ध तर त्याही पलिकडे गेले. त्यांनी मैत्रीचा विचार केला. मैत्री म्हणजे म्हणजे, सर्व जिवंत प्राणी- मात्रा विषयी प्रेम. प्रज्ञा आणि करुणेचा अपूर्व संयोग म्हणजे बुद्धाचा धम्म होय. बुध्दांच्या मान्यतेनुसार धम्माची दोन प्रधान तत्वे आहेत. ती म्हणजे प्रज्ञा आणि करुणा. पुढे ते म्हणतात की, माझ्या धम्माचा उद्धेश आहे लोकांनी धम्माचरण करावे. म्हणजे त्यांच्या दुः खाचा नाश होईल. जो शीलवान आहे. तो प्रज्ञावान आहे. जो न्यायी आहे, जो सत्य वचनी आहे. जो आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणिक आहे, अशा व्यक्तीवर लोक प्रेम करतात याचा विश्वास बुद्ध देतात. अविद्येचा कलंक हा सर्वात वाईट आहे. भिक्खूंनो हा कलंक दूर करा आणि निष्कलंक व्हा, असे आवाहनही म. बुद्ध करतात. ज्यांनी स्वतःवर विजय मिळविला, तो परमवीर आहे. सुज्ञ व्हा. न्यायी व्हा आणि सुसंगत व्हा. नीच माणसाशी मैत्री नसावी. तर श्रेष्ठतम माणसाशी मैत्री असावी असे निक्षून सांगत, त्यांनी दुष्ट, श्रेष्ठतम, सुज्ञ, न्यायी आणि सज्जन माणसांचे गुण वैशिष्ट्ये अत्यंत सूक्ष्मपणे विषद केले आहेत. बुद्धानी भिक्खूंच्या दीक्षेला संघ म्हणून म्हटले. तर गृहस्थांची उपासक दीक्षा हे, धम्मानुगामी होत. भिक्खूकरिता नियम दंडणीय. तर उपासक नियम म्हणजे शील आणि त्याच्या पालनाची अपेक्षा. भिक्खू धनसंपदा धारण करु शकत नाही. भिक्खूच्यां संहितेत १) काया अवगुंटणासाठी तीन चिवरे. कमरेस गुंडाळण्यासाठी एक अंतरवस्त्र. अंगावर घ्यावयाचे एक उत्तरासंग. थंडी- वार्यापासून संरक्षणासाठी एक संघाटी.२) करगोटा ३) भिक्षापात्र ४) वस्तरा ५) सुई-दोरा, ६) पाणी गाळण्याचे वस्त्र, अशा निम्न ८ वस्तूंशिवाय भिक्खूजवळ अन्य काहीही असू नये ! असे, खुद्द म. बुद्धांनी सांगीतले आहे. शुद्धोधन व महाप्रजापती यांच्या आग्रही निरोपाप्रमाणे, म. बुद्ध हे तब्बल ७ वर्षांनी परत कपिलवस्तुला गेले. असा हा दुस-यांदा आलेला प्रसंग मन छिन्न-विच्छिन्न करतो. शुद्धोधन व महाप्रजापतीला नैराश्येने घेरले होते. यशोधरेची बुद्धानी स्वतः भेट घेतली. तिने पण आपल्या डोक्याचे केस, अलंकार, सुंगधी द्रव्ये, त्यागलेली होती. अन्न ग्रहणासाठी तिनेसुद्धा मृतिकापात्रच स्वीकारलेले होते. यशोधरेने ७ वर्षाच्या राहूलला, हा तुझा बाप म्हणून बुद्धाचा परिचय करून दिला. आणि याही काळात म. बुद्धानी वनात वास्तव्य करत, आपल्याच राजनगरीत दारोदार फिरून चारिका केली. आता हा प्रसंग फक्त सुज्ञ व संवेदनशील व्यक्तीच जाणू शकतो. अर्थात माणूस व विश्वाच्या कल्याणासाठी, म. बुद्ध आणि त्यांच्या आई-वडील व पत्नी-मुल यांना काय व किती सोसावे लागले आहे ? यावरून, तरी ज्ञान निर्मितीसाठी समर्पणाची महती लक्षात यावयास हवी.


म. बुद्धांच्या तत्वज्ञानाचा डॉ. आंबेडकरांवर प्रभाव पडणे हे तरी सहाजिकच आहे. पण राष्ट्रसंत तुकाराम, राजे छ.संभाजी महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदीवरही म. बुद्ध तत्वज्ञाचा पारिणाम होता. परिपूर्ण व्यक्ती आणि संपन्न राष्ट्र घडविण्यावर बुद्धाचा भर होता. समग्र बद्ध स्वीकारला तर विश्व बलशाली होईल. बुद्ध विचारदर्शन ही एक राष्ट्रीय संपती आहे. विचार करु या का ? वेळ आणखी गेलेली नाही. म. बुद्ध आम्हास पेलला नाही ! या भावी संभावनेपेक्षा, गांभीर्याने चिंतन करून, आपल्या वारस भविष्यासाठी अशा प्रकाशयुगाचे आपण विनयपूर्वक सामूहिक स्वागत करू या.





**रामकुमार रायवाडीकर**
**पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते तथा मुक्त- पत्रकार, लातूर.**
**मो.९८९०४४४५२१**



कला शिक्षक अमोल कोलतमे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक
**शुभेच्छा!**
: शुभेच्छूक :
शिरीषकुमार शेरखाने
एनसीआयबी अधिकारी तथा पत्रकार, लातूर







लातूर येथील सुप्रसिध्द उद्योजक तथा काँग्रेसचे माजी नगरसेवक मा.सचिन बंडापल्ले यांना वाढदिवसानिमित्त
**हार्दिक शुभेच्छा!**



: शुभेच्छूक :
शिरीषकुमार शेरखाने
एनसीआयबी अधिकारी तथा पत्रकार, लातूर

# खा.डॉ.शिवाजी काळगे यांचा शेकाप च्यावतीने सत्कार आणि शुभेच्छा!



लातूर लोकसभा मतदारसंघ इंडीया व महाविकास आघाडीचे नुतन खासदार डॉ शिवाजी बंडाप्पा काळगे यांचा सत्कार शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत शेकापने खंबीरपणे आघाडीचे उमेदवार डॉ काळगे यांच्या पाठीशी उभे राहून विजयात मोलाची भर घातली ,एवढेच नाही तर लोहा कंधारचे शेकापचे आ.शामसुंदर शिंदे यांनी मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहे.खासदारांचे पिताश्री भाई बंडाप्पा काळगे हे शेकापचे ज्येष्ठ नेते असुन सत्तरच्या दशकात भाई उध्दवराव पाटील यांच्या लातूर लोकसभा निवडणुकीत त्यांच्या विजयसाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

नुतन खासदार डॉ काळगे यांचा सत्कार शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्हा चिटणीस भाई उदय गवारे यांनी केला.या प्रसंगी भाई बंडाप्पा काळगे,प्रा. दत्ता सोमवंशी, भाई एकनाथराव कवठेकर,भाई सतीश देशमुख, डॉ.अदिमाया गवारे, अँड भालचंद्र कवठेकर,प्रा.रमेश पारवे, भाई अनिल सिध्दे, भाई शिवाजी लोखंडे आदी उपस्थित होते.

# वीरशैव कक्कया समाजबांधवांच्या उपस्थितीत श्रीमंत कावळे यांचा वाढदिवस साजरा



**लातूर/प्रतिनिधी**

समस्त कक्कया समाज महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष निवृत्ती सावळकर व केंद्रीय उपाध्यक्ष शंकरराव इंगळे व मुंबई राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कार्याध्यक्ष शेषेराव सावळकर व महासंघाचे वरिष्ठ बालाजी महावरकर यांच्या उपस्थितीत लातूर जिल्ह्याचे महासंघाचे अध्यक्ष श्रीमंत केरबा कावळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी समाजाचे वरिष्ठ पदाधिकारी डॉ. चंद्रकांत शेरखाने व वर्धन बचत गटाचे पदाधिकारी महादेव कावळे, धुरपाजी शेरखाने, खंडेराव कावळे, सुनील लाडके, राहुल साबणे, तेजेश शेरखाने, कु.श्रेयश इंगळे व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला.

# सी.के.मुरळीकर यांच्या हस्ते विनोद खटके यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर : येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनमित्त सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करून त्यात ३० जोडपे विवाहाबध्द केले. सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील व्ही.एस.पँथर्सच्यावतीने मध्यवर्ती कार्यालयात चर्मकार महासंघाचे उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर यांच्याहस्ते व्ही.एस.पँथर्सचे अध्यक्ष विनोद खटके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर, शिवसेना विधानसभा प्रमुख एस.आर.चव्हाण, रवी कुरील, बबलु जोगदंड, बाबासाहेब कांबळे आदि उपस्थित होते.



# महाराणा प्रतापसिंह हे मातृभूमीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणारे महानयोद्धा-गुणवंत मिसलवाड

**नांदेड/प्रतिनिधी**

मध्ययुगीन काळात १५ व्या शतकामध्ये या भारतभूमीवर अनेक साम्राज्यांनी आक्रमणे केली. अशा कठीण परिस्थितीमध्ये वीर शिरोमणी वीर महाराणा प्रतापसिंह यांनी परिवराची तमा न बाळगता अकबर मोगल साम्राज्याशी शेवटच्या श्वासापर्यंत लढा देऊन मातृभूमीला सुरक्षित ठेवले, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते श्री गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. ९ जून २०२४ रविवार रोजी सकाळी ११ वाजता मेवाडचे सम्राट, त्याग बलिदान, परिक्रमाचे प्रतीक, शुरवीर पराक्रमी राजा महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८४ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, मेवाड, चित्तोडगड, हल्दाघाट, मांडलगड, मुक्तीसाठी रणांगण गाजविले. वेळप्रसंगी जंगलातील कंदमुळे खाऊन शत्रूशी झुंज दिली. यावेळी लाडका चेतक नामक आश्वाने २६ फुट दरीवरून छलांग मारून चेतक आश्वाने शौर्य गाजविले. घायाळ अवस्थेत चेतक आश्वाने महाराणा प्रतापसिंह यांना सुरक्षित स्थळी पोहचवून चेतकने प्राण सोडला. पण महाराणा प्रतापसिंह यांचे प्राण वाचविले अशा या महान शूरवीर योद्ध्याचा कार्य आणि विचारांचा आपण सर्वांनीच आदर्श घेऊन देशाप्रती, समाजाप्रती कार्य करण्याची ही काळाची नितांत गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

सर्वप्रथम आगाराचे बसस्थानक प्रमुख मा. श्री. याशीन हमीद खान यांच्या हस्ते श्री महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून बसस्थानक प्रमुख याशीन हामीद खान, नाभिक समाजाचे नांदेड जिल्हाध्यक्ष अशोकराव खोडके, सहायक कार्यशाळा अधीक्षक श्रीनिवास रेनके, वाहतूक निरीक्षक सचिनसिंह चव्हाण, सुधाकरराव घुमे, वाहतूक नियंत्रक राजेंदरसिंघ चावला, निर्दोष पवार, सुरेश फुलारी, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गणवंत एच. मिसलवाड, पाळी प्रमुख अविनाश भागवत, बचित्तरसिंघ गाडीवाले, कर्मचारी संभाजी सूर्यवंशी, संजयसिंह आव्हाड, अनिल हंकारे, गंगाधर जोशी, ज्ञानेश्वर जाधव, गोविंद तेलंग, सुरक्षा रक्षक, माधवराव आरसूलवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी आगारातील कामगार, कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# डॉ.रेड्डी यांच्या वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण पुस्तकाचे आ.रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी**

वैद्यकीय अभ्यास क्रमात झालेल्या बदलाला अनुसरून लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ आनंद रेड्डी यांच्या शरीररचना शास्त्रात या नावीन्यपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन भाजपा नेते तथा कार्यकारी संचालक आ रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शनिवारी प्रकाशन करण्यात आले. अशा प्रकारचे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील पहिलेच पुस्तक आहे. हे पुस्तक एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांबरोबरच डेंटल, आयुर्वेदिक तसेच फिजिओथेरपीच्या पदवी व पदवीत्युत्तर विद्यार्थ्यांना हे उपयुक्त ठरणारे आहे.

लातूर येथील एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयात शरीर रचना शास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ आनंद जगन्नाथ रेड्डी यांनी शरीररचनाशास्त्रात एक नावीन्यपूर्ण पुस्तक लिहिले आहे. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांकाची असलेल्या Elsevier कंपनीने सदरील पुस्तक प्रकाशित केले आहे. पदवी व पदवीत्युत्तर विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारे पुस्तकाचे प्रकाशन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याहस्ते





झाले. यावेळी एमआटी वैद्यकीय महाविद्यालयाचे शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, उपअधिष्ठिता डॉ बी एस नागोबा, शैक्षणिक व प्रशासकीय संचालक डॉ सरिता मंत्री, लेखक डॉ आनंद रेड्डी, डॉ मुकुंद भिसे, डॉ सचिन भावठाणकर, डॉ पठाण, डॉ महेश उगले यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च, तळेगाव दाभाडे पुणे येथून २००४ मध्ये एम बी बी एस पदवी घेवून भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज, पुणे येथून २०११ मध्ये एमडी (शरीर रचना शास्त्र ) शिक्षण पूर्ण केल्यानंतर डॉ आनंद रेड्डी हे जुलै २०१२ पासून एम आय टी मेडिकल कॉलेज मध्ये शरीर रचना शास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून मेडिकलच्या विद्यार्थ्यांसाठी सातत्याने नावीन्यपूर्ण गोष्टींचा (बोन बँक) अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. २०१९ साली राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय क्षेत्रात आमूलग्र बदल करून उइचए ( क्षमता अधिष्ठित वैद्यकीय शिक्षण) ही नवी शिक्षणप्रणाली अस्तित्वात आणली. अभ्यास क्रमाच्या अगदी सुरुवातीपासून विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करणे, त्यांचे गुणवत्तापूर्ण मूल्य मापन करणे, मूल्यवर्धित शिक्षण देणे इत्यादी बाबीवर आधारित ही शिक्षण प्रणाली आहे. वैद्यकीय अभ्यास क्रमात झालेल्या या सर्व नवीन बदलाला अनुसरून डॉ आनंद जगन्नाथ रेड्डी यांनी शरीररचनाशास्त्रात एक नावीन्यपूर्ण पुस्तक लिहिले आहे. अशा प्रकारचे वैद्यकीय शिक्षणक्षेत्रातील पहिलेच पुस्तक आहे. वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे नीट परिक्षा २०२४ मध्ये घवघवीत यश



लातूर/प्रतिनिधी

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने नीट २०२४ परीक्षेमध्ये याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील सोळंके तन्वी हंसराज हिने ७२० पैकी ६७० गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला तसेच शेख सोहेल अब्दुल गणी यांनी ५७८ गुण घेऊन महाविद्यालयातून दुसरा क्रमांक पटकावला तसेच माळी सुशांत हनुमंत यांनी ५७५ गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला तसेच नोकजा विजय अनिल कुमार ५०३ गुण, जोशी दिशा दिनेश ४५३ गुण, शेख सुजान बशीर ४१८ गुण व जोद्राने श्रद्धा सिद्धेश्वर ४०५ गुण घेऊन अनुक्रमे चौथा, पाचवा, सहावा व सातवा मान येण्याचा महाविद्यालयामध्ये पटकावला. तसेच महाविद्यालयातील डॉ. रत्नाकर बेडगे यांची कन्या रेणुका रत्नाकर बेडगे हिने ६२५ गुण, डॉ. भास्कर नल्ला रेड्डी यांची कन्या मेधा भास्कर रेड्डी हिने ४४० गुण प्राप्त केले. या सर्व गुणवंत व गुणवान (पान २ वर)

# दिक्षा महिला बँकेच्यावतीने नेत्र तपासणी शस्त्रक्रिया व रक्तदान शिबीर संपन्न





लातूर : स्व. विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दिक्षा महिला बँक व आधार फाऊंडेशनच्या माध्यमातून अनोखा उपक्रम राबविण्यात आला. रक्तदान शिबीर, मोफत नेत्र तपासणी आणि तपासणीनंतर लागलीच मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली.

त्यामुळे गरजू रुग्णांवर वेळीच उपचारही झाले. भव्य रक्तदान शिबीरात ३८ रक्तदात्याने केले. मोफत नेत्र तपासणी शिबिरास १५१ जणांनी मोफत केली तपासणी करण्यात आली तर लागलीच २५ मोतीबिंदू शस्त्रक्रियाही करण्यात येणार आहेत. उन्हाळा दिवस सुरू असल्याने लातूर शहरातील सर्वच ब्लड बँक येथे रक्ताचा तुटवडा असतो. सामान्य नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे यंदाही शहराच्या पूर्व भागातील दिक्षा महीला नागरी बँक व आधार फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीरात ३८ जणांनी रक्तदान केले. नेत्र तपासणी शिबिरासाठी उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय उदगीर यांची तज्ञ डॉक्टरांची टीमच्या निगराणी खाली १५१ जणांनी मोफत डोळ्यांची तपासणी केली. २५ मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी उदगीर येथील लॉयन्स नेत्र रुग्णालयात पाठवण्यात आले. रामभाऊ तलवाड यांच्या माध्यमातून हा सामाजिक उपक्रम पार पडला. याप्रसंगी एनसीआयबी अधिकारी तथा पत्रकार शिरीषकुमार शेरखाने उपस्थित होते.

# 'राजमाता जिजामाता'त गुणवंतांचा गौरव





**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील विविध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व पालकांचा संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शुक्रवारी शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.अध्यक्षस्थानी प्राचार्य जी. आर. मुंडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. आर. धुमाळ, प्रा. वैशाली पाटील, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. नभा लहाने यांनी केले.

यावेळी बारावी परीक्षेत ९५.६७ टक्के गुण घेतलेला प्रज्ज्वल विष्णू कराड, ८६.०० टक्के गुण मिळविलेला भूषण मिलिंद घरटे व ८४.३३ टक्के गुण मिळवलेल्या इशिता अरविंद खोत यांचा, 'नीट' परीक्षेत यश मिळविलेला भूषण मिलिंद घरटे (६९२), विशाल राजाराम गांगड (६६५), साहिल अजय नायक (६२५), महेश माधव नागरगोजे (६११), श्रुती दयानंद बद्दे (६००), जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरलेले मंथन दीपक पालकर (९५.४०), विनित तुशीकांत सांगोले (९४.०५), आदित्य संजय चव्हाण (९३.२६) व समर्थ तानाजी भोसले (९०.००) यांचे कौतुक करण्यात आले.

तुळजाभवानी उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी परीक्षेत ८३.३३ टक्के गुण मिळवलेला साहिल नबी शेख, ७५.६७ टक्के गुण मिळवलेली श्रावणी राजेंद्र सूर्यवंशी व ७५.१७ टक्के गुण मिळविलेल्या सिध्दी सागर भराडिया, 'नीट' परीक्षेत यश मिळविलेला गौरव गुंडाजीबापू मोरे (६३१), सिध्दी सागर भराडिया (५६६), साहिल नबी शेख (४९७) व जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरलेल्या पार्थ दत्ता कुलकर्णी (९२.५) यांचे कौतुक करण्यात आले.

# चलो आझाद मैदान, वीरशैव ढोर कक्कया समाज बांधवांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (वा.) /प्रतिनिधी**

वीरशैव कक्कया ढोर समाजासाठी शासनाने संत कक्कया आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, या मागणीसाठी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून मंगळवार, १८ जून रोजी सकाळी साडेदहा वाजता मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वीरशैव कक्कया कल्याण मंडळाचे सचिव यशवंत ब. नारायणकर, सहसचिव सूर्यकांत इंगळे, महासंघाचे अध्यक्ष निवृत्ती सावळकर, पुणे येथील अध्यक्ष-हनुमंत सोनवणे यांनी केले आहे. ढोर कक्कया समाजाच्या न्याय हक्कासाठी आजपर्यंत कुठल्याही सरकारकडून कक्कया समाजाला पुरेपूर न्याय मिळाला नाही आणि समाजाने सुद्धा कुठलेही आंदोलन करून आपल्या न्याय हक्कासाठी मागणी केली नाही. पण आजची परिस्थिती आणि उद्याची चिंता व्यक्त करता ढोर कक्कया समाजाला अडचणींचा सामना करावा लागत आहे. कारण उद्योग व्यवसायातून आणि शिक्षणातून आर्थिक बळ नसल्यामुळे हा समाज उद्योग व्यवसायातून वंचित होत चालला आहे. मागील काही वर्षांपासून आरक्षण धोक्यात येत आहे.

**पूर्वतयारीसाठी बैठक**

संत कक्कया आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, या मागणीसाठी मंगळवारी आझाद मैदान येथे करण्यात येणाऱ्या धरणे आंदोलनाबाबत सोमवार, १७ जून रोजी सामाजातील कार्यकर्ते व पदाधाकीर यांची बैठक श्री गणेश विद्या मंदिर हायस्कूल धारावी मुंबई. इथे सायंकाळी पाच वाजता एक घेण्यात येणार आहे. या बैठकीत आंदोलनाबाबत विचार विनिमय व चर्चा करण्यात येणार आहे. बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# श्रीमती लक्ष्मीबाई मिसलवाड यांचे निधन



**नांदेड/प्रतिनिधी**

मौजे कबीरवाडी ता. देगलूर येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ महिला श्रीमती लक्ष्मीबाई हुल्लप्पा मिसलवाड (आक्का) यांचे दि. ९ जून २०२४ रविवार रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात्त दोन मुली, एक मुलगा, सुन, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्यावर मौजे कबीरवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्या एसटी मेकॅनिक तथा सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांच्या चुलती होत.





✻ अभिवादनकर्ते ✻
खबर से हकीकत तक वृत्तपत्र परिवार आणि शेरखाने परिवार



आता सहवास जरी नसला
तरी स्मृति सुगंध देत
राहील, जीवनाच्या प्रत्येक
वळणावर आठवण तुझी
येत राहिल आजच्या प्रसंगी
आपणास विनम्र अभिवादन!

✻ अभिवादनकर्ते ✻
खबर से हकीकत तक
वृत्तपत्र परिवार आणि
शेरखाने परिवार, लातूर

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्र्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200